# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२७००**

**अपिलार्थी श्री. अशोक पवार**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
बोरीवली विभाग, बोरीवली पोलीस ठाणे,
२ रा मजला, बोरीवली (प.), मुंबई - ४०००९२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-११)**
बोरीवली पोलीस ठाणे इमारत, दुसरा मजला, एस. व्ही. रोड,
बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.१२.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.०६.२०२४ | १०.०७.२०२४ | १८.०७.२०२४ | ३०.०७.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०३.०९.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १०.०७.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ३०.०७.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थींनी दि. ०८.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार 1) I require information and copy of complaint along with annexures made by Rajendra Dave to the Sr. Police in Charge Borivali police station. 2) I require information and copy of my statements recorded before Police Inspector (Crime) Shir. Kale Borivali police station. 3) I require information and copy of all documents and statements on record with Police Inspector. Shri Kale while conducting enquire. 4) I require information and copy of all notices send to the non-complainant / witness for recording of statement regarding the complaint made Rajendra Dave. 5) I require information and copy of statement recorded from Rajendra Dave before issuing the notice to non-complainants/witness. 6) I require information and copy of station diary or any such record prepared or made by Police Inspector (Crime) Shir. Kale Borivali police station before and after recording the statement from Rajendra Dave, which is compulsory for Police officer to bring on record. 7) I require information regarding the status of complaint of

..२/-

Rajendra Dave बाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दि.१०.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर देण्यात आले आहेत. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने दि. १८.०७.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०७.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अभिलेख तपासून देय माहिती १५ दिवसांत देण्यात यावी असे आदेशित करुन प्रथम अपील काढलेले आहे.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीच्या अनुपस्थितीबद्दलच्या खुलाशासह व अपिलार्थींना आवश्यक असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १४.०१.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 12-12-2025

**मुंबई**
**दिनांक : १२.१२.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

# अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२७००
# अपिलार्थी श्री. अशोक पवार
## सुनावणी दिनांक : १४.०१.२०२६ (In continuation of order dt १२.१२.२०२५)

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीच्या अनुपस्थितीबद्दलच्या खुलाशासह व अपिलार्थींना आवश्यक असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

२. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी जन माहिती अधिकारी यांचे लेखी निवेदन दि. १२.०१.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींना दि. १०.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आली होती. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ३०.०७.२०२४ रोजी अभिलेख तपासून देय माहिती १५ दिवसांत देण्यात यावी असे आदेशित केले होते. त्याप्रमाणे दि.१२.०८.२०२४ अन्वये पुन्हा माहिती अपिलार्थींना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असेही सादर केले की, त्यांनी अपिलार्थींना बोरीवली पोलीस ठाणे यांची दि.०८.०३.२०२४ रोजीची जबाबाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे.

३. अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेले जबाब राजारामपुरी पोलीस ठाणे, कोल्हापुर येथील दाखल गुन्हा नोंद क्र. १३६/२०१९ यांच्याशी संबंधीत आहे. परंतु, त्यांनी श्री. राजेंद्र दवे यांनी दाखल केलेल्या तक्रारीची प्रत त्या तक्रारीचे अनुषंगाने त्यांचे नोंदविलेले जबाबाची प्रत हवी आहे.

४. सुनावणी दरम्यान आयोगासमोर अपिलार्थी स्पष्ट करु शकले नाही की, माहिती अर्जात नमुद त्यांचे जबाब बोरीवली पोलीस ठाणे येथे कोणते तारखेस नोंदविण्यात आले होते.

५. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थींनी जर त्यांना अधिकची स्पष्टता करुन दिली तर ते पुन्हा अभिलेख तपासून त्यांना जबाबाची प्रत उपलब्ध करुन देऊ शकतील. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी पुढे आयोगास सादर केले की, तक्रारीची प्रत अपिलार्थींना उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही.

६. अपिलार्थींनी ज्या जबाबाची प्रत त्यांना माहिती अर्जांतर्गत अपेक्षित आहे व ज्या तारखेस जबाब नोंदविण्यात आले त्या तारखेची माहिती उपलब्ध करुन दिल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींचे स्वत:चे जबाबाची प्रत अपिलार्थींना उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थींनी तक्रार अर्जाची प्रत मिळवून देण्याची विनंती माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत तपासून वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळवावे.

..२/-

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

16-1-2026

**मुंबई**
**दिनांक : १६.०१.२०२६**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**